महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग, जि. रायगड.

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/आस्थापना २/सहाय्यक प्राध्या. /जाहिरात/३५८५/२०२५ दिनांक.२५/११/२०२५

वेबसाईटद्वारे प्रसिध्द (www.gmchalibag.in/gmch)

## "जाहिरात"

विषय:- सहाय्यक प्राध्यापक पदे ३६४दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संस्थास्तरावर निवड समितीमार्फत भरणेबाबत.

संदर्भ:- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक:- एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३ मंत्रालय, मुंबई दि. १८ जुलै २०२४.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन शासन निर्णय दि. १० ऑगस्ट २००१ अन्वये, अधिष्ठाता यांना प्रदान केलेल्या प्राधिकारात विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करुन सहाय्यक प्राध्यापक "गट-ब" या पदावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरती नियुक्तीचे अधिकार संस्थास्तरावर संबंधित अधिष्ठाताना प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक, यांची रिक्त पदे ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता किंवा मा.शासन/संचालनालय, मुंबई यांचेमार्फत बंधपत्रित उमेदवार अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत/शासन निवड मंडळ अथवा नियमित उमेदवार अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थास्तरावरील निवड समितीमार्फत कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मानधन व गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि. २७/११/२०२५ ते दि. ०३/१२/२०२५ सकाळी ११.०० ते सायं.०५.०० वाजेपर्यंत. सुटीचे दिवस वगळुन) |
| २) | मुलाखतीचा दिनांक | दि. ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ३) | मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग (परिषद हॉल) |

इच्छूक उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.gmchalibag.in/gmch) तसेच मा. संचालनालयाच्या (www.med-edu.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीसोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध (Download) करुन घ्यावा. तसेच सदरील अर्ज परिपूर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षिणक अर्हतेचे कागदपत्र/प्रमाणपत्राच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात (जाहिरातीमधील अटी व शर्ती क्र.१२ व विहीत नमुन्यातील अर्जात नमूद केल्याप्रमाणे) उमेदवारांनी कार्यालयातील आवक-जावक शाखेस प्रत्यक्ष अथवा पंजीकृत डाकेने सादर करावा व त्याबाबतची पोच घ्यावी. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये ऑनलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांसह व साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहील्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

(पान क्र. ०२ वर)

संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील ३६४ दिवसाकरीता भरावयाच्या पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

*** Required Educational Qualification As per N.M.C. Norms.**

| Sr. No. | Name of subject | Vacant post | Required Educational Qualification | Experience |
|---|---|---|---|---|
| 1 | Anatomy | 01 | M.S. (Anatomy)/M.D. Anatomy/MBBS with M.Sc. (Anatomy)/M.Sc. (Medical Anatomy) with Ph.D. (Medical Anatomy)/ M.Sc. Medical Anatomy with D.Sc. Medical Anatomy/DNB. | 1) One year as Senior Resident in the concerned subject in a recognized/ permitted medical college after acquiring MD/MS Degree.<br>*2) 3 year Junior Resident in a recognized/ permitted medical college in the concerned subject and one year as Senioar Residents in the concerned subject in a recognized/ Permitted medical college. In case of DNB candidate equated to MD/MS in terms of clause 4A of Schedule-1, in addition 3 year teaching experience in the subject as Resident/Registrar/ Demonstrator/ Tutor/or work experience gained during DNB training. one year as Senior Resident in a recognized/ Permitted medical college. |
| 2 | Physiology | 01 | M.D. (Physiology)/MBBS with M.Sc. (Medical Physiology)/ M.Sc. (Medical Physiology) with Ph.D. Medical Physiology/ M.Sc. Medical Physiology with D.Sc. Medical Biochemistry/DNB. | |
| 3 | Pathology | 01 | MD/MS/DNB in the Pathology Subject | |
| 4 | Forensic Medicine & Toxicology | 02 | MD/MS/DNB in the Forensic Medicine Subject | |
| 5 | General Medicine | 03 | MD/MS/DNB in the General Medicine Subject | |
| 6 | Paediatrics | 01 | MD/MS/DNB in the Paediatrics Subject | |
| 7 | Psychiatry | 01 | MD/MS/DNB in the Psychiatry Subject | |
| 8 | General Surgery | 01 | MD/MS/DNB in the General Srugery Subject | |
| 9 | Anesthesiology | 02 | MD/MS/DNB in the Anesthesiology Subject | |
| 10 | Emergency Medicine | 01 | MD/MS/DNB in the Emergency Medicine Subject | |
| 11 | Community Medicine (Preventive and Social Medicine) | 04 | M.D Social and Preventive Medicine/ M.D. Community Medicine/ DNB. | |
| 12 | Ophthalmology | 01 | M.S. (Ophthalmology)/ M.D (Ophthalmology)/DNB | |
| 13 | Radiagnosis (Radioloy). | 01 | M.D (Radiodiagnosis) M.D. (Radiology)/M.S (Radiology)/ DNB | |
| 14 | Obstetrics and Gynaecology | 01 | M.D (Obstetrics and Gynaecology)/<br>M.S (Obstetrics and Gynaecology)/ DNB. | |
| Total | | 21 | | |

(पान क्र ०३ वर)

*Those candidates who have undergone DNB training in a multi speciality teaching hospital with at least 500 beds, involved in various postgraduate/super-speciality teaching programmes provided that the once out of three DNB supervisors (teacher) qualify as postgraduate teacher as per MCI norms in his/her previous appointment. Nd one out of three DNB supervisors (teachers) qualify as postgraduate teacher as per MCI norms in his/her previous appointment; and one out of remaining two should qualify as postgraduate teacher as per MCI regulations with the following bed requirement for teaching unit: (As per The Gazette of India-Extraordinary part-III-Section 4 New Delhi, Thursday, November 1,2018/Kartika 10, 1940 Dt. 31/10/2018)

उक्त नमूद दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तक्यात नमुद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदांसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तद्नंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवारांची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सूचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती :-

१. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
२. सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी :- सदरील उमेदवारांना दि. ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्ठांमधून भागविण्यात येईल.
३. वयोमर्यादा:- उमेदवाराचे वय अराखीव वर्गाकरीता ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.
४. गुणवता यादी ही उपरोक्त नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राध्यान्य देण्यात येईल.
५. जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.
६. उमेदवार या महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे "ना-हरकत प्रमाणपत्र" अर्जासोत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे? असल्यास केव्हा? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.
७. ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.
८. उमेदवाराची निवड करतांना ज्या उमेदवारांनी बंधपत्रित सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केला नाही, अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.
९. सदर पदांकरिता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी) राहील. ३६४ दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा ३६४ दिवसांसाठी पुनर्नियुक्ती बाबत प्रस्ताव मा. आयुक्त वैद्यकिय शिक्षण संशोधन व आयुष मुंबई यांना सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
१०. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

(पान क्रं ०४ वर)

११. सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणांस या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय राहणार नाहीत.

१२. (अ) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस., डी.एम., एमसी.एच. किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईंट. ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एस.सी किंवा एम.जी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत, शोधनिबंध, रिसर्च पेपर इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. उक्त रिक्त असलेल्या पदाकरीता सहाय्यक प्राध्यापक या पदावर नियुक्ती संबंधात यापुर्वी ज्यांनी अर्ज/निवेदने सादर केली आहेत त्यांनी नव्याने विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यापुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(डॉ. पूर्वा पाटील)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड .

प्रति,

१. उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग.
२. अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत :-

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

विभागीय निवड मंडळ

सहाय्यक प्राध्यापक अर्जाचा नमुना

फोटो

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,
अलिबाग (जि. रायगड)

| अर्जातील पदाचे नांव:- | विभागाचे नांव :- | |
|---|---|---|
| उमेदवाराचे संपूर्ण नांव:- | | |
| संपूर्ण पत्ता:- | | |
| मोबाईल नं. | पॅन क्रमांक. | आधार कार्ड क्रं. |

| जन्म दिनांक | तारीख | महिना | वर्ष | मुलाखतीच्या दिवशीचे वय | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| प्रथम,व्दितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस गुणपत्रिकांची छायकित प्रत. | होय | नाही |
| प्रयत्न प्रमाणपत्र, आंतरवासिता प्रमाणपत्र. | होय | नाही |
| एम. बी. बी.एस. पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र. | होय | नाही |
| पदव्युत्तर परीक्षेचे गुणपत्र, प्रमाणपत्र, उत्तीर्ण आणि प्रयत्न प्रमाणपत्र. | होय | नाही |
| एम.सी.आय./महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच नुतनीकरण प्रमाणपत्र. | होय | नाही |
| एक वर्ष वरिष्ठ निवासी पदाचे अनुभव प्रमाणपत्र. | होय | नाही |
| सहाय्यक प्राध्यापक पदाचा अनुभव असल्यास, अनुभव प्रमाणपत्राची प्रत. | होय | नाही |
| जन्म तारखेचे प्रमाणपत्र. | होय | नाही |
| आधार कार्ड व पॅन कार्ड. | होय | नाही |
| उमेदवाराच्या नावात बदल असल्यास गॅजेटची प्रत. | होय | नाही |

उमेदवाराची स्वाक्षरी दिनांकासह

(कृ.मा.प)

टिप :-

५. अर्जदाराने अर्जामधील सर्व माहिती अचूक भरणे अनिवार्य आहे. अर्जात माहिती अपूर्ण असल्यास सदरील अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
६. अर्जदाराने अर्जासोबत सर्व छायांकित (SELF ATTESTED) सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात.
७. अर्जदाराने अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर विहीत जागेवर लावणे अनिवार्य आहे.
८. अर्जदाराने संस्थेत कार्यरत असल्यास आपला अर्ज संबंधित विभागप्रमुख यांचे मार्फत कार्यालयीन वेळेत जमा करणे अनिवार्य आहे.

| तपासणी समितीची स्वाक्षरी | | | |
|---|---|---|---|
| | अध्यक्ष | सदस्य | सदस्य |

तपासणी समिती शेरा:-